रिट याचिका क्र. १२९४/२०१८ (श्रीमती जयश्री शिवाजी जाकाते व इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर) आणि त्यासोबत जोडलेल्या इतर याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार स्थापन 'एक सदस्यीय समिती' च्या कामकाजासाठी लागणारा खर्च आणि मा. सदस्यांचे मानधन (Honorarium) अदा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र. न्यायाप्र-२०२५/प्र.क्र.५६/२५/टीएनटी-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०७ ऑगस्ट, २०२६

संदर्भ :-

१. रिट याचिका क्र. १२९४/२०१८ (श्रीमती जयश्री शिवाजी जाकाते व इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर) आणि त्यासोबत जोडलेल्या इतर याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक ०४.१२.२०२५ रोजीचे आदेश.
२. मा. न्यायमूर्ती श्री. राजेश जी. केतकर (निवृत्त न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय) यांचे दिनांक २७.०३.२०२६ रोजीचे पत्र.
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२४२५/(७०/२५)/अर्थसंकल्प, दि.१७.१०.२०२५

प्रस्तावना:

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र. १२९४/२०१८ (श्रीमती जयश्री शिवाजी जाकाते व इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर) आणि त्यासोबत जोडलेल्या इतर याचिकांमध्ये मा. न्यायालयाने संदर्भाधीन दिनांक ०४/१२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये मा. न्यायमूर्ती श्री. राजेश जी. केतकर (निवृत्त न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय) यांची 'एक सदस्यीय समिती' (Single Member Committee) नियुक्त केली आहे. त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालयाच्या संदर्भाधीन आदेशातील परिच्छेद क्र. १४ (D) मध्ये सदर समितीच्या कामकाजासाठी लागणारा खर्च आणि मा. सदस्यांचे मानधन (Honorarium) याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

२. सदर समितीची दिनांक २७.०३.२०२६ रोजी द्वितीय बैठक पार पडली आहे. तसेच पुढील बैठक दिनांक ०२.०५.२०२६ रोजी नियोजित होती. सदर नियोजित बैठक

स्थगित करण्यात येऊन पुढील बैठक दिनांक १८.०७.२०२६ रोजी मुंबई येथे पार पडली आहे. मा. न्यायमूर्ती श्री. राजेश जी. केतकर (निवृत्त न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय) यांनी सदरहू बैठकीचे रु.३,००,०००/- (रु. तीन लाख फ़क्त) इतके मानधन अदा करण्याची मागणी व त्यानुषंगाने तपशील संदर्भ क्र. २ अन्वये सादर केला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने सदर 'एक सदस्यीय समिती' च्या कामकाजासाठी लागणारा खर्च आणि मा. सदस्यांचे मानधन (Honorarium) वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

प्रस्तुत प्रकरणातील प्रस्तावनेत नमूद वस्तुस्थिती व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या रिट याचिका क्र. १२९४/२०१८ (श्रीमती जयश्री शिवाजी जाकाते व इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर) आणि त्यासोबत जोडलेल्या इतर याचिकांमधील दिनांक ०४.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये नियुक्त मा. न्यायमूर्ती श्री. राजेश जी. केतकर (निवृत्त न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय) यांची 'एक सदस्यीय समिती' (Single Member Committee) ची दिनांक १८.०७.२०२६ रोजी बैठक पार पडली आहे. सदर बैठकीच्या कामकाजासाठी लागणारा खर्च आणि मा. सदस्यांचे मानधन (Honorarium) यासाठी रु.३,००,०००/- (रु. तीन लाख फ़क्त) इतका निधी वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर देयकाची रक्कम रु. ३,००,०००/- "मागणी क्रमांक ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, ११०, अशासकीय माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना सहाय्य (००) (००) (०१) सर्वसाधारण माध्यमिक शाळांना सहायक अनुदान (२२०२०४४२), ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखालील चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा. यासाठी लेखाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी व आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३६२/व्यय-५/२०२६, दि.३०/०५/२०२६ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०८०७१११६५६०६४९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VISHAL LOHAR

Digitally signed by VISHAL LOHAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=4FA523DF886C1CD91CDD339489CBF322A94E6F57181810BBB2AF94E2AC15A90B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3AA51AA033E42289A1E6F0663B9EA9F2A095148DA640207D6C4EC664DB552754, cn=VISHAL LOHAR
Date: 2026.08.07 11:18:11 +05'30'

(विशाल लोहार)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
३. मा. उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य
४. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक
५. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अ. मु. स. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
९. महालेखापाल -१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०.महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
११.महालेखापाल -२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१२.महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१३.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१४.संचालक माहिती व जन संपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१५.विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई.
१६.निवडनस्ती (टीएनटी-२ कार्यासन)